
# कोवळी जीवने कोमेजली,

# पवित्र तत्त्वांच्या रक्षणार्थ!

## गुरू गोबिंद सिंगांच्या लहान

## मुलांचे ऐतिहासिक सर्वोच्च

## बलिदान



## जनहितार्थ निर्मिती:

## गुरू नानक इन्स्टीट्यूट ऑफ ग्लोबल स्टडीज

# कॅनडा

# प्रस्तावना

नैसर्गिक आणि मानव-निर्मित संकटांमध्ये अनेक निष्पाप तरुण जीव गमावले जातात, हे खरंच खूप वेदनादायक आहे. चुकीच्या धार्मिक सिद्धांताचे अनुसरण करून – सात आणि नऊ वर्षांच्या लहान मुलांना त्यांचा शीख धर्म सोडून देऊन इस्लामचा स्वीकार करण्यात सांगितले गेले, हे अतिशय दुर्दैवी आहे.

जर त्यांनी मूर्खपणा करून या सूचनेचे पालन करण्यास नकार दिला, तर ते आपला जीव गमावून बसतील असे त्यांना सांगण्यात आले.

या दोन लहान राजपुत्रांनी – साहिबजाद्यांनी वाहेगुरूंनी (देवाने) दिलेला धार्मिक स्वांतत्र्याचा मूलभूत हक्क अबाधित ठेवण्यासाठी हौतात्म्याचा स्वीकार करायला मागेपुढे पाहिले नाही.

साहिबजाद्यांनी ताबडतोब दिलेले उत्तर ऐकून या ठिकाणी उपस्थित असलेले मुघल शासक, मंत्री आणि इतर ज्येष्ठ अधिकारी स्तंभित झाले आणि त्यांनी साहिबजाद्यांना श्रीमंती आणि अधिकृत पदे देण्याचे आमिष दाखवले. आणि जेव्हा या आमिषांनासुद्धा राजपुत्र बळी पडले नाहीत तेव्हा त्यांना शिक्षा, तुरुंगवास, छळ आणि मृत्यूदंड देण्याच्या धमक्या देण्यात आल्या.

मात्र, या सर्व धमक्या आणि लाभाची आमिषे साहिबजाद्यांचा निश्चय तोडण्यात अयशस्वी ठरली.

साहिबजादे - झोरावर सिंग आणि फतेह सिंग, यांच्याभोवती जिवंतपणी एक विटांची भिंत बांधून त्यांना दफन करण्यात आले.

हे छोटे पुस्तक म्हणजे शीखांचे दहावे गुरू असलेल्या गोविंदसिंगांच्या तरुण राजपुत्रांचा अतुलनीय त्याग जगासमोर आणण्याचा एक नम्र प्रयत्न आहे.

आम्हाला आशा आहे की, शीख इतिहासाच्या या दुःखद भागातून अगदी सात वर्षे वयाच्या कोवळया वयातसुद्धा आपण मानवी सदसद्विवेकबुद्धीवर परिणाम करू शकतो, याची शिकवण आपल्याला मिळेल.

साहिबजादे आणि मानवाच्या धार्मिक हक्काबद्दल आणि अशा तत्त्वांचे पालन करण्याकरिता सर्वोच्च त्याग करण्यासाठी तयारी दाखवण्याची शिकवण देणारे त्यांचे पालक - गुरू गोबिंद सिंगजी आणि माता

**अजित कौर (जितो जी) आणि त्यांची आजी माता गुजर कौर (गुजरी जी) यांच्यासमोर आम्ही नतमस्तक आहोत.**

**समाजसेवेला समर्पित**

ज्ञान सिंग संधू<br>
चेअर<br>
बोर्ड ऑफ गव्हर्नर्स<br>
गुरू नानक इन्स्टीट्यूट ऑफ ग्लोबल स्टडीज,<br>
लँगली, ब्रिटीश कोलंबिया, कॅनडा

# संदर्भ

गुरू नानकांचा (इसवीसन 1469 – 1539) जन्म पंजाबमध्ये एका ग्रामीण कुटुंबात झाला. त्यावेळी इब्राहीम लोधीची जुलमी राजवट होती. लोकांवर अविश्वसनीय अत्याचार करण्यात येत होते. कायदा आणि सुव्यवस्था नव्हती - फक्त दुष्ट जुलूम होता. महिलांना आदर किंवा अधिकार दिलेले नव्हते. लोकांना शिक्षणाचा अधिकार किंवा शिक्षणाची सोय नव्हती. एकाबाजूला लोक राजाच्या दडपशाही करणाऱ्या प्रशासनाचा सामना करत होते तर दुसऱ्या बाजूला स्वतःला देवाचे दलाल मानणारे धर्ममार्तंड लोकांचे शोषण करत होते.

हे सगळे पाहून, नानकांनी सुधारणा करण्याच्या चळवळीला सुरुवात केली. एका सामान्य खेडूताने एका बाजूला निरंकुश राजसत्तेशी आणि दुसऱ्या बाजूला शोषक धर्ममार्तंडांशी सामना करणे ही गोष्ट अभूतपूर्व आणि दूरदृष्टी दाखवणारी होती.

त्यांना बळ देणारी शक्ती म्हणजे दैवी प्रेरणाच होती, यात काही शंका नाही. सत्य, न्याय आणि समानता ही त्यांच्या चळवळीची महत्त्वाची तत्त्वे ठरली. साधी तर्कसंगती, सारासार विचार, ताकदवान संवाद आणि मुक्त होण्याची मानवाची नैसर्गिक प्रेरणा या इंधनांनी या चळवळीचा अग्नी प्रज्वलित ठेवला.

सामाजिक, आध्यात्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक सुधारणां असलेल्या चळवळीलाच पुढे 'सिखी' असे म्हणण्यात येऊ लागले.

जुलमी राजवट आणि कर्मकांडांद्वारे शोषण करण्यावर अवलंबून असलेल्या धर्ममार्तंडांना या चळवळीची भीती वाटू लागली आणि नानकांच्या चळवळीतून जागृत झालेली स्वातंत्र्याची भावना दडपून टाकण्यासाठी आणि तिला विरोध करण्यासाठी या दोन गटांनी हातमिळवणी केली.

गुरू अर्जन देवजी आणि गुरू तेग बहादूर यांनी शासकांच्या अत्याचारातून आणि धार्मिक शोषणातून लोकांना मुक्त करण्याच्या नानकांच्या चळवळीसाठी हौतात्म्य पत्करले.

चळवळ जिवंत ठेवण्यासाठी शस्त्रे उचलणे भाग पडलेले – दहावे शीख गुरू - गुरू गोबिंद सिंग यांनी मुघलांच्या जुलमाशी लढण्यासाठी मोठे सैन्य तयार केले. त्याचवेळी त्यांनी त्यांच्या बरोबरच्या


लोकांमध्ये स्वातंत्र्याची आणि स्व-निश्चयाची भावना जागृत करण्यासाठी जागृती करण्यास आणि प्रेरणा देण्यास सुरुवात केली.

सतराव्या शतकाच्या शेवटी मोठ्या मुघल सैन्यावर गुरू गोबिंद सिंगांनी अनेक लष्करी विजय मिळवले. दुर्दैवाने मुघलांच्या अधिपत्याखाली असलेल्या अनेक स्थानिक शासक आणि राजांकडून मुघलांना मदत आणि प्रोत्साहन मिळत होते.

गुरू गोबिंद सिंगांनी आनंदपूर साहिब (जगप्रसिद्ध आधुनिक शहर चंदीगढजवळ) येथे एक मोठा किल्ला बांधला. हा एक खूप मोठा लष्करी तळ होता आणि मुघल शासनाला हा एक संभाव्य धोका वाटला आणि त्यांनी किल्ल्याला वेढा घातला.

# प्रकरण 7

**गुरू गोबिंद सिंगांचा किल्ला, आनंदपूर मुघलांच्या वेढ्यात होता. आक्रमण करणारे मुघल सैनिक आणि शीख योद्ध्यांमध्ये अनेक महिने**



**घनघोर लढाई सुरू होती आणि शिखांची सुरक्षा भेदण्यात मुघल आक्रमकांना अपयश आले.**

**हताश होऊन, मुघल सम्राट औरंगजेबाने शांततेचा प्रस्ताव घेऊन एक दूत शीख गुरूंकडे पाठवला. औरंगजेबाने पवित्र कुराणावर हात ठेवून, वेढा घातलेल्या किल्ल्यातून सर्व शीख व्यक्ती आणि गुरूंचे कुटुंब बाहेर पडले तर त्यांना सुरक्षित मार्ग पुरवण्याची शपथ घेतली.**

**---------**

# प्रकरण 8

**औरंगजेबाच्या शब्दावर विश्वास ठेवावा, असे गुरू गोबिंद सिंगांना वाटत नसले तरीही त्याने कुराणच्या नावाने शपथ घेतली असल्यामुळे गुरूंनी**



**मात्र, गुरूंचे शीख सैन्य किल्ल्यातून बाहेर पडू लागताच, मुघलांनी संधीचा फायदा उठवला आणि शिखांवर मोठा हल्ला चढवला.**


**'सिरसा' नदीच्या काठी, घनघोर लढाई झाली. शीख योद्धे त्वेषाने लढले आणि धारातीर्थी पडलेल्या प्रत्येक शिखाने**

**अनेक मुघल सैनिकांना कंठस्नान घातले.**

**------------------**

# प्रकरण 9

**या लढाईच्या दरम्यान, गुरूंच्या संपूर्ण कुटुंबाची ताटातूट झाली. लहान मुले - साहिबजादा झोरावर सिंग आणि**



**फतेह सिंग त्यांची आजी म्हणजे माता गुजरीजी यांच्याबरोबर राहिले. ते दुर्गम भागातून आणि दाट जंगलातून वाट काढत राहिले.**

**रस्त्यात, त्यांना सिंह आणि सापांसह अनेक जंगली श्वापदांचा सामना करावा लागला, पण आजीच्या संरक्षणामध्ये साहिबजाद्यांना अतिशय सुरक्षित वाटत होते. स्तोत्रे म्हणत निर्भयपणे त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. वाटेत त्यांच्या आजीने त्यांना अनेक प्रेरणादायी गोष्टीसुद्धा सांगितल्या.**

**-------**

# प्रकरण 10



-----

**दोन मोठे राजपुत्र - अजित सिंग आणि जुझार सिंग त्यांचे वडील - गुरू गोबिंद सिंग यांच्याबरोबर होते. त्यांनी 'सिरसा' नदी ओलांडली आणि रोपार येथे रात्र घालवली. पहाटे ते चमकौर साहिब येथील त्यांच्या किल्ल्यावर पोचले.**

# प्रकरण 11

**अतिशय मोठ्या आणि थकवणाऱ्या प्रवासानंतर, माता गुजरीजी आपल्या दोन साहिबजाद्यांसह 'कम्मो'-**



**या पाणक्याच्या झोपडीजवळ पोचल्या. माताजींना पाहताच, तो बाहेर आला आणि आदराने हात जोडून म्हणाला, 'तुम्ही माझ्या साध्या झोपडीत थोडी विश्रांती घेण्यासाठी आलात, हे माझे भाग्य आणि सन्मान आहे.'**

**आजी आणि साहिबजाद्यांनी सुटकेचा निश्वास टाकला आणि कम्मोची भक्ती पाहून त्यांना आनंद झाला. अंधारसुद्धा पडू लागला होता त्यामुळे कम्मोच्या झोपडीत रात्र घालवणे योग्य आहे, असे माताजींनी ठरवले. 'लछमी' नावाच्या स्त्रीने पटकन स्वयंपाक केला आणि माताजी आणि**


# प्रकरण 12

**साहिबजाद्यांना तो आदरपूर्वक अर्पण केला. देवाची कृपा समजून त्या सर्वांनी अन्न ग्रहण केले.**

**-----**

# प्रकरण 13

दुसऱ्या दिवशी ज्याने आधी गुरूंच्या लंगरमध्ये (कम्युनिटी किचन) काम केले होते, अशा गंगू ब्राह्मणाला



गुरूंच्या कुटुंबाबद्दल कळले आणि तो त्यांना भेटायला आला. हात जोडून त्याने माताजींना विनंती केली आणि आपल्या 'खेरही' गावात येण्याचा आग्रह केला. त्याने माताजींना खात्री दिली की, त्यांची व्यवस्थित काळजी घेतली जाईल आणि त्यांना कोणतीही समस्या येणार नाही. त्याने, पुन्हा आश्वस्त केले की, "तुम्ही तिथे आहात हे कोणालाही कळणार नाही."

गंगूने 'माझ्यावर विश्वास ठेवा' असे सांगितल्यावर माताजींनी अतिशय शांतपणे विचार केला आणि आपले थोडेसे सामान एका खेचरावर लादण्यास सुरुवात केली. लवकरच ते गंगूच्या गावाच्या दिशेने निघाले.

दोन्ही साहिबजादे आजीच्या शेजारून चालत होते. काहीवेळा, ते आपल्या वडिलांची - गुरू गोबिंद सिंगांची आणि आपल्या मोठ्या भावांची अजित


# प्रकरण 14
**सिंग आणि जुझार सिंगांची चौकशी करत होते.**

**त्यांना गावी पोचायला संध्याकाळ झाली. ते खेरही गावात गंगूच्या घरी विसावले आणि माताजींनी बरोबर आणलेल्या वस्तू बाजूला ठेवल्या.**

**----**

# प्रकरण 15

**मातार्जींनी साहिबजाद्यांना कपडे बदलायला लावले आणि त्यांचे अंथरूण घालून दिले. तिघांनी संध्याकाळची प्रार्थना म्हटली. माताजींनी दोन्ही साहिबजाद्यांना गच्च मिठी मारली,**




**त्यांना आशीर्वाद दिला आणि झोपवले. आपली डोकी आजीच्या छातीवर ठेवून साहिबजादे गाढ झोपी गेले.**

**रात्री, गंगूने आवाज न करता, गुरूंचे कुटुंब विश्रांती घेत असलेल्या खोलीत प्रवेश केला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, माताजी गाढ झोपल्या आहेत, अतिशय शांतपणे आणि काळजीपूर्वक त्याने पलंगाखाली ठेवलेल्या त्यांच्या सामानात शोधाशोध सुरू केली. शेवटी, त्याला सोन्याच्या नाण्यांनी भरलेली पिशवी मिळाली. त्याने पिशवी घेतली आणि पटकन पण शांतपणे तो खोलीबाहेर आला.**

**माताजींच्या लक्षात आले की, कोणीतरी खोलीत येऊन पलंगाखाली ठेवलेल्या सामानात चाचपणी केली आणि हळूच खोलीच्या बाहेर गेले;**

# प्रकरण 16
**पण त्यांनी आरडाओरडा केला नाही.**

**-----**

# प्रकरण 17

सकाळी, माताजी उठल्यावर त्यांना जमिनीवर त्यांचे सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तेव्हा त्यांनी गंगूला जाब विचारला.



'आमचे सगळे सामान जमिनीवर पडले आहे. बाहेरचा मुख्य दरवाजासुद्धा बंद आहे. सोन्याची नाणी असलेली पिशवी कुठे गेली?' गंगूने आश्चर्यचकित झाल्याचे ढोंग केले आणि इकडेतिकडे शोधू लागला.

काहीही न बोलता, गंगू बाहेर पळाला आणि ओरडू लागला," चोरी झाली आहे. माताजींच्या वस्तू चोरीला गेल्या आहेत."



माता गुर्जरीजींनी गंगूला आत बोलावले आणि सल्ला दिला की, 'सार्वजनिकपणे असा आरडाओरडा करणे बरोबर नाही. तू सोन्याची नाणी ठेवून घेऊ शकतोस आणि कोणीही तुझ्याकडून ती परत मागितलेली नाहीत.

हे ऐकून गंगू चिडून ओरडला,' हे अपमानकारक आहे. मी

# प्रकरण 18




तुम्हाला आश्रय दिला आणि तुम्ही माझ्यावर चोरीचा आरोप करत आहात?' माताजींनी त्याला शांत करण्याचा खूप प्रयत्न केला, पण गंगू घराबाहेर पडला आणि रागाने ओरडू लागला.

-------

# प्रकरण 19

**गंगू थेट कोतवालाच्या (आयुक्ताच्या) कार्यालयात गेला. आत जाऊन त्याने नमस्कार केला**



**आणि हळू आवाजात कुजबुजला, साहेब, मी तुम्हाला एक अतिशय गुप्त माहिती सांगायला आलो आहे.**

**कोतवालाने विचारणा केली, "सांग, काय माहिती घेऊन आला आहेस तू?"**

**"साहेब, गुरू गोबिंद सिंगांची आई आणि त्यांचे दोन लहान मुलगे, माझ्या घरात लपले आहेत."**

**हे ऐकून कोतवाल खुश झाला. त्याने ज्येष्ठ पोलिस अधिकाऱ्याला बोलावले आणि त्याला सैनिक घेऊन गंगूच्या घरी जाऊन गुरूंच्या कुटुंबाला अटक करण्यास सांगितले.**

**-----**

# प्रकरण 20

**पोलिस अधिकारी गंगूच्या अंगणात पोचले, तेव्हा शेजाऱ्यांची आणि बघ्यांची उत्सुकता चाळवली. पोलिस**



**मागच्या बाजूला गेले आणि माताजी व राजपुत्र शांतपणे आणि निष्काळजीपणे आरामात पलंगावर बसलेले पाहून त्यांना आश्चर्य वाटले.**

**पोलिस अधिकाऱ्याने कोतवालाची आज्ञा सांगितली आणि गुरूंच्या कुटुंबाला आपल्याबरोबर येण्यास फर्मावले.**

**माताजींनी दोन्ही साहिबजाद्यांना घट्ट मिठी मारली आणि म्हणाल्या, "माझ्या मुलांनो, उठा, चला, जाऊया."**


**साहिबजादा झोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग लगेचच तयार झाले आणि माता गुजरींबरोबर बाहेर पडून पोलिस अधिकाऱ्यांबरोबर जाऊ लागले.**

# प्रकरण 21

-----

# प्रकरण 22

**दरम्यान, घराबाहेर खूप गर्दी जमली. गंगू**



**एका बाजूला उभा होता आणि लोक त्याच्याकडे बोट दाखवत होते. तो दोषी असल्यामुळे खाली पाहत होता आणि लांब थांबला होता. एक स्त्री म्हणाली, "पाहिलेत हा किती कृतघ्न बदमाश आहे? त्याने या सगळयांना आपल्या घरी आणले आणि बाहेर जाऊन अधिकाऱ्यांना त्यांची माहिती दिली." अजून एक जण म्हणाला, या निष्पाप जीवांनी राज्याचे काय बिघडवले आहे?" ते सर्वजण एकाच आवाजात बोलत होते, "त्यांच्या आजीच्या चेहऱ्यावरचे तेज आणि सात्विकता पहा."**


**लोक स्तंभित झाले - ते निःशब्द झाले आणि पोलीस आजीला आणि दोन साहिबजाद्यांना घेऊन जात असताना ते असहाय्यपणे पाहत राहिले.**

**--------**

# प्रकरण 23

**माताजी आणि दोन साहिबजाद्यांनी एक रात्र मोरींदा येथे तुरुंगात घालवली.**

**शांततेची परमावधी असलेल्या माता गुजरींनी प्रेमाने आणि मायेने**




**दोन्ही साहिबजाद्यांना जवळ घेतले आणि त्यांना गुरू नानकांच्या शीख अनुयायांच्या शौर्याच्या आणि धाडसाच्या अनेक अतुलनीय कथा त्यांना सांगितल्या. गुरू अर्जन देवजी आणि गुरू तेग बहादूरजी यांच्या अभूतपूर्व हौतात्म्याच्या कथा सांगून त्यांनी राजपुत्रांना प्रेरणा दिली.**

**शेवटी, तिघांनी संध्याकाळची आणि रात्रीची प्रार्थना म्हटली आणि तुरुंगाच्या खडबडीत जमिनीवर ते झोपी गेले.**

**---------**

# प्रकरण 24

दुसऱ्या दिवशी, पहाटे माताजी आणि दोन साहिबजाद्यांना बैलगाडीने 'बस्सी' पोलीस स्टेशनला नेण्यात आले. लोकांचा जथा त्यांच्या बैलगाडीबरोबर



चालत होता. लोक आश्चर्याने एकमेकांना विचारत होते की एका वृद्ध स्त्रीला आणि दोन निष्पाप अजाणत्या वयाच्या मुलांना का कैद केले आहे? माताजी आणि दोन साहिबजाद्यांना घेऊन जाणारी बैलगाडी जवळ येताच, लोक घरातून बाहेर येऊन त्यांना नमस्कार करू लागले. शूर आणि निर्भय साहिबजाद्यांचे चेहरे पाहिल्यावर लोक म्हणाले, "हे आहेत शूर पित्याचे शूर पुत्र."

त्यांना जाताना पाहणाऱ्या स्त्री-पुरुषांचे असे बोलणे ऐकून गुरूंच्या कैद केलेल्या कुटुंबाला घेऊन जाणारे पोलिस घाबरले आणि त्यांनी आपला वेग वाढवला.  बैलगाडीचा मालक बैलांनी सरहिंदला शक्य तितक्या लवकर पोचावे म्हणून त्यांना वेगाने पळवत होता.

# प्रकरण 25

----

# प्रकरण 26

**पोलिसांनी आणलेल्या दोन्ही साहिबजाद्यांना वझीर खानच्या दरबारात पायी चालत नेण्यात आले. साहिबजादे दरबारात पोचताच,**



**त्यांच्या लक्षात आले की, मुख्य दार बंद होते आणि केवळ एक खिडकीएवढे प्रवेशद्वार उघडे होते. आता जाण्यासाठी, प्रत्येकाला मान खाली घालूनच जावे लागत होते.**

**अतिशय चाणाक्ष साहिबजाद्यांना नवाबाची खेळी लक्षात आली, त्यांनी राजाच्या अधिकाऱ्यासमोर मान न**

**तुकवता आधी त्यांचे पाय आत ठेवले.**

**------**

# प्रकरण 27

**नवाब वझीर खानाचा दरबार सुरू होता. साहेबजाद्यांनी दरबारात प्रवेश**




**आत्मविश्वासाने आणि निर्भयपणे म्हटले. *वाहे गुरूजी का खालसा, वाहे गुरूजी की फतेह!***

**साहिबजाद्यांच्या या अभिवादनामुळे सर्वांचे लक्ष या शूर आणि निर्भय लहान मुलांकडे गेले.**

**-----**

# प्रकरण 28

भगवी वस्त्रे परिधान केलेल्या या गोऱ्यापान मुलांनी कमरेला तलवारी लटकवलेल्या होत्या. ती अतिशय देखणी आणि आकर्षक दिसत होती. सर्व होते.



नवाब वझीर खानाने त्यांच्याकडे पाहिले आणि अतिशय प्रेमाने म्हणाला, "मुलांनो तुम्ही अतिशय छान आणि आकर्षक दिसत आहात. तुम्ही इस्लाम धर्माचा स्वीकार केलात आणि मुस्लीम झालात तर या इस्लामी देशाला तुमचा खूप अभिमान वाटेल. तुमच्या सर्व इच्छा पूर्ण करण्यात येतील."

दोन्ही साहिबजादे ठामपणे एकाच आवाजात म्हणाले, "आम्हाला आमच्या धर्माचा अभिमान आहे आणि भौतिक वस्तूंचे आमच्या लेखी फार महत्त्व नाही."

नवाबाला त्यांच्या ठाम आणि निश्चयी प्रतिसादामुळे खूप राग आला पण त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत.

# प्रकरण 29

-------

# प्रकरण 30

**दोन्ही साहिबजाद्यांनी इस्लामचा स्वीकार केला तर नवाब वझीर खानाने त्यांना पुष्कळ संपत्ती, मोठया पदव्या, उच्च पदे आणि सर्व शाही लाभ देण्याचे आश्वासन दिले.**

**दोन्ही साहिबजादे आपल्या अतुलनीय पद्धतीने आणि शैलीत ठामपणे आणि एकाच आवाजात म्हणाले, "सत्य आणि आमचा धर्म यांचा मान ठेवण्यासाठी आम्ही आमच्या जीवाचा त्याग करण्यासाठीसुद्धा तयार आहोत." नवाब खूप चिडला आणि साहिबजाद्यांचे उत्तर ऐकून स्तंभित झाला. त्याने 'काझी' म्हणजेच दरबारातील घडामोडींबद्दलच्या**



**धार्मिक अधिकाऱ्याला बोलावले आणि साहिबजाद्यांना आपली धार्मिक शिक्षा देण्यास सांगितले.**

**नावाबाची आज्ञा ऐकून काझी आश्चर्यचकित झाला.**

**-----**

# प्रकरण 31

पुन्हा एकदा, नवाब वझीर खानाने साहिबजाद्यांचे मन वळवण्यासाठी त्यांना सल्ला देण्याचा प्रयत्न केला. तो साहिबजाद्यांना म्हणाला,



'तुम्ही अतिशय कोवळया वयाचे आहात आणि आनंद उपभोगण्यासाठी तुमच्या पुढे तुमचे पूर्ण आयुष्य आहे. आमचा सल्ला ऐकलात तर आम्ही तुम्हाला मोठया जमिनी (जहागिरी) देऊ - तुम्ही येथे आणि स्वर्गातसुद्धा एक श्रीमंत आयुष्य जगाल.

अतिशय धैर्याने आणि निर्भयपणे साहिबजादा झोरावर सिंग म्हणाला, 'आमचा लढा जुलूम आणि अन्यायाविरुद्ध आहे. आम्ही गुरू गोबिंद सिंगांचे पुत्र आहोत आणि आमचा वंश गुरू अर्जन देवजींपर्यंत मागे जातो. आम्ही त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर चालू आणि आमच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी कोणताही त्याग करायला मागेपुढे पाहणार नाही.

नवाब हळुवारपणे कुजबुजला, 'वा! आपल्या धर्माचा किती अभिमान!'

# प्रकरण 32

----------

# प्रकरण 33

**तिथे उपस्थित असलेले दिवाण सुचा नंद, उभे राहिले आणि साहिबजाद्यांकडे गेले. त्यांनी विचारले, 'जर तुम्हाला मुक्त केले, तर तुम्ही कुठे जाल?' साहिबजादा झोरावर सिंग म्हणाला, 'आम्ही जंगलात जाऊ,**



**आमच्या शीख बांधवांना एकत्र करू, काही घोडे मिळवू आणि तुमच्याशी लढायला परत येऊ.'**

**दिवाण सुचा नंद पुढे म्हणाले, "तुम्हाला माहिती आहे, तुमचे वडील लढाईत मारले गेले आहेत - विरोध करणे थांबवा आणि नवाबाचा सल्ला मान्य करा".**

**दोन्ही साहिबजादे एकदमच म्हणाले, 'आमच्या वडिलांना कोण मारू शकतो? ते अतिशय सामर्थ्यवान आहेत. आम्हाला तुमच्या सल्ल्याची गरज नाही. ही अन्यायकारी आणि जुलमी राजवट संपेपर्यंत आम्ही लढत राहू.'**

------

# प्रकरण 34

**सुचा नंदांना उद्देशून साहिबजाद्यांनी शीख कुटुंबाच्या मूल्यांचे वर्णन करणाऱ्या काही कवितेच्या ओळी म्हणून दाखवल्या. ते म्हणाले,**

*आमच्या कुटुंबात ही गौरवशाली परंपरा आहे;*

*आम्ही आमच्या जीवाचा त्याग करतो, पण*

*आमच्या धर्माचा नाही!*

**दिवाण सुचा नंद एकाचवेळी खूप चिडले**



**आणि आश्चर्यचकितसुद्धा झाले. काही शब्द पुटपुटून ते नवाब वझीर खानकडे गेले आणि म्हणाले, "नवाब साहेब, साप मारायचा आणि त्याच्या पिल्लांना जिवंत ठेवायचे हे काही योग्य नाही. तरसाची पिल्लेसुद्धा तरसच असतात. ही मुले मोठी होतील आणि बंड करतील - त्यांना**

# प्रकरण 35

**शिक्षा दिलीच पाहिजे".**

**नवाबाने दिवाण सुचा नंदांचा सल्ला शांतपणे ऐकला. नवाब, काझी आणि दिवाण सुचा नंद विचारविनिमय करत असताना,**

**-------**

# प्रकरण 36

**दोन्ही राजपुत्र भीतीचे किंवा चिंतेचे कोणतेही चिन्ह न दर्शवता**



**एकमेकांशी मोकळेपणाने आणि खेळीमेळीने बोलत होते. साहिबजाद्यांचे नशीब ठरवले जात असतानाही त्यांच्या चेहऱ्यावरचे निर्भय भाव पाहून दरबारातील लोक आणि पाहणारे लोक थक्क झाले.**

**नवाब पुन्हा काझीला म्हणाला**

**'दिवाणाच्या प्रश्नांना देण्यात आलेल्या उद्धट उत्तरांचा विचार करा. या मुलांना मुक्त करणे शहाणपणाचे ठरणार नाही. वडीलांप्रमाणेच ही मुले बंडाचा मार्ग स्वीकारतील.'**

**------**

# प्रकरण 37

**काझीने सुचा नंद आणि साहिबजाद्यांमधील शाब्दिक संवादाचासुद्धा विचार केला.  त्याने एक क्षण विचार केला,**



**त्याच्या आसनावरून उठला आणि आपला निर्णय जाहीर केला," या मुलांनी बंड करायचे ठरवले आहे - त्यांना जिवंत गाडले पाहिजे."**

**काझीचा निर्णय ऐकून उपस्थित असलेल्या प्रत्येकाला धक्का बसला. पण निर्भय साहिबजादे अजिबात न घाबरता शांतपणे उभे होते. काझीने नवबाला सल्ला दिला की,**

**'या मुलांना मालेर-कोटलाच्या नवाबाकडे सोपवा, म्हणजे या मुलांच्या वडिलांनी त्याच्या भावाला मारल्याचा बदला तो घेऊ शकेल.'**

**----**

# प्रकरण 38

नवाबाने शेर मुहम्मद खानाला बोलावणे पाठवले. तो आल्यावर नवाब त्याला म्हणाला, 'शेर मुहम्मद खान, गुरू



गोबिंद सिंगांच्या शीखांनी तुझ्या भावाला ठार मारले, तुझ्या भावाच्या मृत्यूचा बदला घेण्याची संधी आता तुला मिळते आहे. गुरूंच्या दोन मुलांना अटक करण्यात आली आहे आणि ती कैदेत आहेत. काझीने त्यांना जिवंत गाडण्याचा निर्णय दिला आहे. त्यांना तुझ्याकडे सोपवण्यात येत आहे आणि काझीने दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी तू केली पाहिजेस.'

हे ऐकून शेर मुहम्मद खानाला धक्का बसला. त्याच्या तोंडून आवाज फुटेना. त्याने धीर एकवटला, एक खोल श्वास घेतला आणि म्हणाला, 'नवाब साहेब, हा अत्याचार आहे. माझा भाऊ लढाईत मारला गेला. या छोट्या जीवांनी काय गुन्हा केला आहे?'

# प्रकरण 39
**रागाने ओरडून तो दरबारातू निघून गेला.**

-----

# प्रकरण 40

**एका बाजूला नवाबाने दोन साहिबजाद्यांना बुरुजामध्ये कैदेत ठेवण्याचा आदश दिला तर दुसऱ्या बाजूला त्याने त्याच्या प्रशासकांना या शिक्षेची लवकर अंमलबजावणी करण्यासाठी फाशी देणारी व्यक्ती शोधण्याचे आदेश दिले.**




**साहिबजादे थंड बुरुजात त्यांच्या आजीकडे पोचले आणि त्यांनी दरबारातील संपूर्ण दिवसाचा घटनाक्रम तिला सांगितला. माताजींनी दोन्ही साहिबजाद्यांच्या वागणुकीचे कौतुक केले आणि त्यांना घट्ट मिठी मारली. 'तुम्ही आत्मसन्मानाने वागलात!' वाहेगुरू (देव) नेहमीच तुमच्याबरोबर असतो.'**

**----**

# प्रकरण 25

दुसऱ्या दिवशी सकाळी दोन्ही साहिबजाद्यांना पुन्हा दरबारात आणण्यात



'मुलांनो, तुमचे ठरले का? तुम्हाला इस्लामचा स्वीकार करण्याची इच्छा आहे का जिवंतपणे गाडून घेण्याची?' अजिबात मागेपुढे न पाहता किंवा न घाबरता दोन्ही साहिबजादे म्हणाले, "आम्ही आमच्या धर्माचा कधीही त्याग करणार नाही."

नवाबाला हे ऐकून आश्चर्य वाटले. एक प्रशासक पुढे आला आणि म्हणाला, 'नवाब साहेब, दोन शाही जल्लाद - शाशल बेग आणि बाशल बेग, दिल्लीहून आले आहेत ते 'सामना' येथील रहिवासी आहेत आणि येथे दरबारातील खटल्यात सहभागी होण्यासाठी आले आहेत. जर तुम्ही त्यांना दोषमुक्त केलेत तर हे दोन जल्लाद दोन मुलांना जिवंत गाडण्यास तयार आहेत.'

नवाबाने आदेश दिला की, 'या जल्लादांचा' खटला फेटाळावा. त्याने दोन्ही साहिबजाद्यांना या जल्लादांकडे सुपूर्त करण्याचे आदेश दिले.

जल्लाद पुढे आले, त्यांनी मुजरा केला आणि म्हणाले 'जशी तुमची आज्ञा, नवाब साहेब.'

-----

# प्रकरण 43

**पोलिसांनी दोन्ही साहिबजाद्यांना दरबाराच्या बाहेर आणले. बाहेर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.**



**कोवळ्या वयाच्या दोन मुलांना जिवंत गाडण्याची शिक्षा झाली आहे, हे ऐकून लोकांना (पुरुष आणि स्त्रिया) धक्का बसला. लोक विचारत होते:**

**'या लहान मुलांनी कोणता गुन्हा केला आहे?'**

**'अरे देवा, ही विटंबना आहे. हा एक गंभीर अन्याय आहे.'**

**'ही छोटी मुले किती निर्भय आहेत, पाहिलेत का?' 'ते खरेच गुरू गोबिंद सिंगांचे शूर पुत्र आहेत.'**

**लोकांना धक्का बसला होता आणि ते निःशब्द झाले. पोलिस या मुलांना पुढे जाण्यासाठी ढकलत होते. लोक काय म्हणत आहेत ते ऐकून पोलिसांनी माना खाली घातल्या आणि ते पुढे जाऊ लागले.**

**----**

# प्रकरण 44

साहिबजाद्यांना जिथे भिंत बांधली जात होती, त्या ठिकाणी आणण्यात आले. काझीसुद्धा या ठिकाणी हजर होता.



दोन्ही साहिबजाद्यांना बांधल्या जात असलेल्या भिंतींच्या मध्यभागी उभे करण्यात आले. काझीने साहिबजाद्यांना पुन्हा आवाहन केले; "इस्लाम स्वीकारा; तुम्ही अनावश्यकपणे तुमचे जीव गमावण्याचा का निश्चय केला आहे?"

अगदी जल्लादांनीसुद्धा साहिबजाद्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांचा निश्चय ठाम होता. त्याऐवजी त्यांनी जल्लादांना आपले काम लवकर सुरू करायला सांगितले. 'या जुलमी मुघल राजवटीचा लवकर शेवट करा. त्यांच्या गुन्ह्यांची ही भिंत अजून उंच बांधा.'

असे म्हणून साहिबजाद्यांनी त्याची सकाळची प्रार्थना [जपजी साही] म्हणण्यास सुरुवात केली. जल्लाद विटांचे अजून थर बांधण्यात मग्न झाले.

----

# प्रकरण 45

**जेव्हा भिंत साहिबजाद्यांच्या छातीपर्यंत आली, तेव्हा नवाब आणि काझी दोघेही जवळ आले आणि म्हणाले, 'मुलांनो,**



**अजूनही वेळ गेलेली नाही, तुमचे जीव वाचवता येतील. कुराणातल्या प्रार्थना म्हणा आणि भिंत पाडून टाकली जाईल.'**

**साहिबजाद्यांचा निश्चय पक्का होता आणि ते स्पष्टपणे आणि शांतपणे म्हणाले,**

**'आम्ही आमचा धर्म सोडणार नाही. आम्हाला आमचे जीव जाण्याची भीती नाही. आम्ही लक्षावधी वेळा जन्म घेतला तरीही, आम्ही तो धर्माची सेवा करण्यासाठीच समर्पित करू.'**

**नवाब आणि काझी त्यांचा दृढ निश्चय पाहून थक्क झाले. जमलेल्या असंख्य लोकांना अश्रू आवरले नाहीत. लोक एकमुखाने म्हणत होते:**

***'ज्या मातेने अशा पुत्रांना जन्म दिला ती धन्य आहे. तो पिता धन्य आहे.'***

# प्रकरण 46

-----

# तात्पर्य....

*साहिबजादे आज दुर्दैवाने आपल्यामध्ये देहरूपाने नाहीत, पण त्यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मृतीमधून आपण देवाने दिलेले अधिकार आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करण्याची प्रेरणा घेतली पाहिजे.*

*जरी, ही महान सोनेरी तत्त्वे अनेक लोकशाहीवादी देशांच्या घटनांमध्ये लिहिलेली असली तरीही त्यांचा आदर होण्यापेक्षा जास्त वेळा उल्लंघनच होते; दुर्दैवाने सत्ताधीश आणि अधिकारी जे या तत्त्वांचे रक्षक आहेत, तेच ती पायदळी तुडवतात.*

*कोणत्याही शासनाने किंवा समाजाने सांगितले होते म्हणून साहिबजाद्यांनी हौतात्म्य पत्करले नाही, तर त्यांचे पालनपोषण आणि त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीमुळे त्यांना मुघल राजवटीच्या निरंकुश सत्तेला तोंड देण्यासाठी धैर्य आणि बळ मिळाले.*

*आध्यात्मिक प्रेरणेची ज्योत आपल्या सगळयांमध्ये आहे. ती थोडीशीच फडफडते आहे. समाजाच्या भल्यासाठी साहिबजाद्यांच्या त्यागाच्या गौरवशाली उदाहरणाचा सन्मान करणे आणि देवाने दिलेले मानवी हक्क, मुक्तता आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करण्यासाठी ठाम उभे राहणे आपल्या हातात आहे.*